महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई-मेल : dg@mcaer.org
वेबसाईट : www.mcaer.org
दूरध्वनी : (०२०) २५५२ ८२५७.

जा.क्र. मकृप/आस्था-४/ ३६८ /२०१९

दिनांक ७ /०२/२०१९

प्रति,

_______________

_______________

_______________

विषय- **संगणक, प्रिंटर, इंटरनेट सुविधा व इतर हार्डवेअर दुरुस्ती करण्यासाठी कॉल बेसीसवर दरपत्रकाबाबत...**

विषयांकित प्रकरणी नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे शासकीय कार्यालय असून या कार्यालयातील विविध विभागात २९ संगणक व अनुषंगिक बाबी वापरात असून या सर्व संगणकांना इंटरनेट सुविधा पुरविण्यात आली आहे. या अनुषंगाने सर्व संगणकांचे सॉफ्टवेअर व हार्डवेअरची दुरुस्तीची कामे वेळोवेळी आवश्यकतेनुसार करण्याकरिता **कॉल बेसीसवर** दरपत्रके मागविणे प्रस्तावित आहे.

सदरच्या कामाकरिता दरपत्रके मागविण्याकरिता खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या आहेत.

१) संगणक, हार्डवेअर व इंटरनेट या बाबींची दुरुस्ती कॉल बेसीसवर करण्यात येईल.
२) त्यासाठी कार्यालयामार्फत दुरुस्तीचा कॉल दुरध्वनीव्दारे दिला जाईल. एका कॉलमध्ये तीन दुरुस्त्या असतील.
३) प्रत्येक कॉलसाठी जॉबशिट तयार करण्यात येईल. तीन दुरुस्त्यांचा उल्लेख जॉबशिटमध्ये करण्यात येईल.
४) सदर जॉबशिट मधील दुरुस्ती कामाची पडताळणी करुन सदर कॉलच्या अनुषंगाने दुरुस्तीचे काम करणे अपेक्षित आहे.
५) दुरुस्तीसाठी नवीन भाग आवश्यक असतील तर ते कार्यालयामार्फत पुरविण्यात येतील.
६) दर सादर करतांना फक्त प्रती कॉल दर नमूद करणे आवश्यक राहील.
७) कार्यालयाचा कॉल आल्यानंतर साधारणपणे २४ तासात दुरुस्तीचे काम करणे आवश्यक राहील.
८) कॉलचा दर हा सर्व करांसहीत असावा व तो खाली दर्शविल्याप्रमाणे दरपत्रकात नमूद करावा.

| अ.क्र. | तपशील | प्रती कॉल दर रुपये |
|---|---|---|
| १) | कृषी परिषद कार्यालयातील संगणक, हार्डवेअर, इंटरनेट उपकरणांच्या दुरुस्ती कामाचा प्रती कॉल दर | |

सदरचे दर दिनांक २०/०२/२०१९ पूर्वी कार्यालयीन वेळेत सहसंचालक, (प्रशासन) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे-४११ ००७. येथे पोहोच होणे आवश्यक आहे.

सादर करावयाच्या दरामध्ये खाडाखोड नसावी. असल्यास ती स्वाक्षांकित करावी.

दरपत्रकाचा लखोटा सिलबंद करुन त्यावर "**कृषी परिषद-संगणक व अनुषंगिक दुरुस्ती कामाचे दरपत्रक**" असा उल्लेख करावा.

सहसंचालक (प्रशासन)